**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 05.10.2023** **वारः गुरुवार**

---

**ठळक बातम्या,**

१. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना सिलिंडर अनुदानात वाढ

२. राष्ट्रीय हळद महामंडळाच्या स्थापनेची अधिसूचना जारी

३. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संवेदनशील, सकारात्मक भावनेनं मदत करण्याचे, मुख्यमंत्र्यांचे विमा कंपन्यांना निर्देश

४. आशियाई क्रीडा स्पर्धेत काल भारतीय खेळाडूंना 12 पदकं

५. मर्यादित षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा आज प्रारंभ

**केंद्रियमंत्री मंडळ निर्णय**

प्रधान मंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना एलपीजी सिलिंडरवर दिल्या जाणाऱ्या अनुदानात प्रति सिलिंडर शंभर रुपयांची वाढ करण्याचा निर्णय काल केंद्रिय मंत्रीमंडळानं घेतला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी ही माहिती दिली.

**हळद महामंडळ**

केंद्र सरकारनं राष्ट्रीय हळद महामंडळाच्या स्थापनेची अधिसूचना काल जारी केली. या महामंडळाच्या माध्यमातून हळद आणि हळदीपासून बनवलेली उत्पादनं विकासित करण्यावर आणि उत्पादन वाढीवर भर दिला जाणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री जी किशन रेड्डी यांनी नवी दिल्लीत याबाबत माहिती दिली.हे महामंडळ हळदीची निर्यात वाढवण्यासाठी जागतिक स्तरावर नवीन बाजारपेठा विकसित करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावेल असं रेड्डी

यांनी सांगितलं. देशातल्या 20 पेक्षा जास्त राज्यांमध्ये हळदीचं उत्पादन घेतलं जातं आणि हळदीच्या जागतिक बाजारपेठेतला भारताचा हिस्सा 62 टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

## पीक विमा मुख्यमंत्री

राज्यातल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा योजनेतून नुकसान भरपाई देताना कंपन्यांनी संवेदनशील आणि सकारात्मक भावनेनं मदत करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमा कंपन्यांना दिले आहेत. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या खरीप हंगाम अंमलबजावणीबाबतची आढावा बैठकीत ते काल बोलत होते. विमा कंपन्यांनी विम्याच्या प्रस्तावांवर घेतलेले आक्षेप जिल्हाधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ पद्धतीनं तपासून घ्यावेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

## हेलिपॅड मुख्यमंत्री

राज्यात आवश्यक तिथं हेलिपॅड उभारणीसाठी तसंच हवाई रुग्णवाहिका सुविधा सुरु करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला मध्यवर्ती संस्था म्हणून काम करता येईल, असा निर्णय कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी शिर्डी, अमरावती तसंच कराडसह विविध ठिकाणच्या विमानतळ विकासाच्या कामांचा आढावा घेतला.शक्य असेल तिथं पोलीस वसाहतींच्या परिसरात अशा हेलिपॅडची उभारणी करावी. जेणेकरून या मैदानांचा पोलिस कवायतींसाठी वापर होईल. त्यांची देखभाल दुरुस्तीही होईल तसंच आवश्यक त्यावेळी या हेलिपॅडचा वापर करणंही शक्य होईल, अशा सूचना बैठकीत करण्यात आल्या. तसंच विविध प्रकल्पग्रस्तांसाठीच्या वाढीव अनुदान खर्चाला मंजुरी देण्यात आली.

## उमेद कार्यक्रम

'उमेद' अंतर्गत महिलांची उत्पादनं मोठ्या कंपन्या आणि खरेदीदार यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी खरेदीदार आणि विक्रेत्यांच्या भेटीचा कार्यक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याचं मत मुख्य ग्राम विकास सचिव एकनाथ डवले यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमात व्यक्त केलं. देशभरातील प्रमुख 41 कंपन्यांच्या प्रतिनिधींसह राज्यातल्या स्वयंसहाय्यता गट आणि शेतकरी महिला उत्पादक

कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यात सहभाग घेतला. यावेळी खरेदीदार कंपन्यांसोबत 28 करार करण्यात आले.

**पालक मंत्री यादी**

राज्यातल्या 12 जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारित यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जाहीर केली. यात पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आलं आहे. चंद्रकांत पाटील सोलापूर जिल्ह्याचे पालक मंत्री असतील. तर कोल्हापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी हसन मुश्रीफ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**नोबेल पुरस्कार**

क्वांटम डॉटसच्या शोधासाठी आणि त्यांच्या एकत्रिकरणासाठी तीन शास्त्रज्ञांना यंदाचा रसायन शास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. फ्रेंच, अमेरिकन आणि एक रशियन शास्त्रज्ञानं या शोध लावला आहे. क्वांटम डॉटस हे अतिशय लहान नॅनोकण अत्याधुनिक एलइडी दूरदर्शन संच, एलइडी दिवे यासह रुग्णाच्या शरीरातील गाठीच्या पेशी नष्ट करण्यासाठी शस्त्रक्रिया तज्ज्ञांना उपयोगी ठरणाऱ्या उपकरणांमध्ये वापरण्यात येतात.

**प्लास्टीक बंधारा**

सांगली जिल्ह्यातील आरवडे गावात प्लास्टिकचा वापर करुन बांधलेल्या पहिल्या बंधाऱ्याचं लोकार्पण करण्यात आल. सैन्यात कार्यरत सचिन देशमुख यांनी तयार केलेल्या या बंधाऱ्यासाठी 17 टनांहून अधिक प्लास्टिक वापरण्यात आलं. त्याविषयी अधिक माहिती देणारा हा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**पंचवीस लाख लिटरपेक्षा अधिक पाणी साठवण्याची या बंधाऱ्याची क्षमता आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील प्लास्टिक कचरा आणि ग्रामीण भागातील शेती तसंच पाण्याची समस्या यावर हा बंधारा मोठा उपयुक्त ठरणार आहे. हा बंधारा तयार करण्यासाठी साडे सात लक्ष रुपये खर्च येतो आणि एक महिन्यापेक्षा कमी कालावधी लागतो. प्लास्टिक बंधाऱ्यांमध्ये प्लास्टिकचा वापर करताना कोणत्याही प्रकारचं प्रदूषण होत नाही. कमी खर्चामुळे लोक सहभागातून असे बंधारे बांधणं शक्य होणार आहे. पन्नास फूट रुंदीच्या ओढे - नाल्यांवर असे पर्यावरणपूरक बंधारे भविष्यात उपयोगी ठरु शकतील. प्लास्टिकपासून निर्मित एक**

**बंधारा सरासरी 500 गावांना प्लास्टिक प्रदूषणमुक्त करू शकतो. जलसंधारण अधिकारी विवेक कुंभार,सरपंच वर्षाराणी पाटील यांच्यासह, पदाधिकारी, गावातील शेतकरी या बंधाऱ्याच्या लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित होते. सचिन देशमुख हे भारतीय सैन्य दलात कार्यरत असून या पर्यावरणपूरक उपक्रमात त्यांच्या कुटुंबियांची देखील त्यांना साथ मिळाली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, महेश भिसे, सांगली.**

**गिरीश महाजन**

स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवेत दाखल होत असलेल्या उमेदवारांनी समाजाप्रती संवेदना बाळगून आपल्या कर्तव्यातून सामान्य माणसाच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी सचोटीनं काम करावं, असा सल्ला ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांनी स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सल्ला दिला. सांगली जिल्ह्यात इस्लामपूर इथं स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभात ते काल बोलत होते. आपल्याकडं येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीनं वागून त्यांचा आधार बना असंही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितलं.

**विश्वकर्मा योजना**

केंद्र सरकारच्या विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओरोस इथं आज एक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. केंद्रिय मंत्री नारायण राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा होणार असून कारागिरांनी मोठ्या संख्येनं मेळाव्याला उपस्थित राहावं असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**कारवाई**

यवतमाळ जिल्ह्यातल्या महागाव तालुक्यात शेतकऱ्यांनी तब्बल वीस एकरात गांजा लागवड केल्याचा प्रकार पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेनं उघडकीस आणला आहे. आंतरपीक पद्धतीने लागवड केलेल्या या गांजाचं मूल्य 25 ते 30 लाख रुपये आहे.

**बँक परवाना रद्द**

अहमदनगर शहरासह विविध ठिकाणी शाखा असलेल्या अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड या शेड्युल्ड बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेनं रद्द केला आहे. याबाबतचं पत्र आरबीआय नं बँकेला पाठवलं आहे असं आमच्या बातमीदारानं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे. या पत्रानुसार बँकेला बँकिंग क्षेत्रामधल्या कुठल्याही गोष्टी करण्यास मनाई करण्यात आली आहे. दरम्यान, या संदर्भात आपण अपील करणार असून बँकेच्या ठेवीदारांचे पैसे देण्यासाठीची तरतूद करून ठेवली आहे असा खुलासा बँकेचे अध्यक्ष अशोक कटारिया यांनी केला आहे.

**क्रीडा संकुल**

सोलापूर जिल्ह्यातल्या मोहोळ इथल्या तालुका क्रीडा संकुलाचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी काल दिले. मौजे वडाळा इथल्या विस्तारित क्रीडा संकुलाला तत्वतः मंजरी दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

**वाहतूक बदल**

सातारा ते लोणंद या राज्यमार्गावर वाठार जवळ काळीमोरी इथं लोहमार्ग विस्तारीकरण आणि रेल्वेपूल पाडण्याचं काम रेल्वेच्या वतीनं करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्यापासून 13 तारखेपर्यंत या मार्गावर सासवड, जेजुरी, नीरा, लोणंद तसंच फलटणकडून येणारी आणि सातारा बाजूकडून जाणारी पर्यायी मार्गानं वळवण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत काल भारतानं 3 सुवर्ण, 5 रौप्य आणि 4 कांस्य पदकं मिळवली. यामुळे या स्पर्धेतल्या भारताच्या आतापर्यंतच्या पदकांची संख्या 81 झाली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतली ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. भालाफेकीत नीरज चोप्रानं सुवर्ण तर किशोर जेना यानं रौप्यपदक पटकावलं.400 मीटर रिले स्पर्धेत भारतीय पुरुष संघानं सुवर्ण आणि महिला संघानं रौप्य पदक मिळवलं. तीरंदाजीत मिश्र दुहेरी प्रकारात ओजस देवतळे आणि ज्योती सुरेखा वेन्नम यांनी सुवर्णपदकाचा वेध घेतला. अविनाश साबळे यानं पुरुषांच्या 5 हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळवलं.

हरमिलन बैंस हिला 800 मीटर धावण्याच्या शर्यतीत तर लवलीना बोर्गेहाईन हिला मुष्टीयुद्धात रौप्यपदक मिळालं.

**क्रिकेट**

मर्यादित षटकांच्या आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आज सुरुवात होत असून अहमदाबाद इथं इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात स्पर्धेतला पहिला सामना होणार आहे. भारताचा पहिला सामना 8 ऑक्टोबर रोजी चेन्नई इथं ऑस्ट्रेलियाच्या संघाबरोबर होणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ आयोजित न करण्याचा निर्णय भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं घेतला आहे.

**हवामान**

सिक्कीममध्ये ढगफुटी झाल्यानंतर तिस्ता नदीला आलेल्या पुरात लष्कराच्या 23 जवानांसह 59 लोक बेपत्ता झाले आहेत. देशाच्या ईशान्य भागात पुढील तीन दिवस अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. इकडे राज्यात, येत्या 24 तासांत कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून उर्वरित राज्यात हवामान कोरडं राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**